# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि –४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ, अधिनियमक्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## प्र–कुलगुरू कार्यालय

एम.आय.डी.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली, जि. गडचिरोली

---

जा.क्र./गोविग/३०९५ दि. ०५/०९/२०२४

**प्रति,**

**मा. प्राचार्य**
**सर्व संलग्नीत महाविद्यालय**
**गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली**

**विषय :– आपल्या महाविद्यालयात आंतरवासिता कक्ष स्थापन करण्याबाबत.**

**महोदय,**

वर उल्लेखीत विषयान्वये कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या दि. २९ फेब्रुवारी २०२४ च्या शासन आदेशानुसार आपल्या महाविद्यालयात आंतरवासिता कक्ष स्थापन करणे आवश्यक आहे. महाविद्यालयात आंतरवासिता कक्ष स्थापन करणे आवश्यक आहे. महाविद्यालयीन उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबरच क्षेत्र कार्याचा तसेच औद्योगीक क्षेत्राचा अनुभव घेता यावा आणि त्यांच्या ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग व्हावा हा या मागील उद्देश आहे.

करीता सदर पत्रासोबत संलग्नीत दिशानिर्देशांचे अवलोकन करून आपला अहवाल intercell@unigug.ac.in या ईमेल वर दि. १८/०९/२०२४ पर्यंत न चुकता पठवावा.

धन्यवाद!

**डॉ. श्रीराम कावळे**
प्र–कुलगुरू,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

Scanned with CamScanner

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## आंतरवासिता कक्ष स्थापनेसाठी महाविद्यालयांना दिशानिर्देश

महाविद्यालयीन उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानाबरोबरच क्षेत्र कार्याचा तसेच औद्योगीक क्षेत्राचा अनुभव घेता यावा आणि त्यांच्या ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनात उपयोग व्हावा यासाठी शासन निर्णयानुसार प्रत्येक महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी आंतरवासिता कक्ष स्थापन करणे अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानूसार सदर आंतरवासिता कक्षाची स्थापना व कार्य या संदर्भात महाविद्यालयांना पूढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) प्रत्येक महाविद्यालयाने महाविद्यालयात आंतरवासिता कक्ष स्थापन करावा.

२) महाविद्यालयात स्थापन करण्यात आलेले आंतरवासिता कक्ष महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आंतरवासितेची प्रक्रिया सुरळीतपणे राबविण्यासाठी जबाबदार असेल.

३) आंतरवासिता कक्षाची रचना महाराष्ट्र शासनाच्या दि. २९ फेब्रुवारी २०२४ च्या शासन आदेशानूसार असावी.

४) महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आंतरवासिताचे वार्षिक वेळापत्रक तयार करून त्याचे पालन करण्याची जबाबदारी महाविद्यालयातील आंतरवासिता कक्षाची असेल.

५) महाविद्यालयातील एक ज्येष्ठ प्राध्यापक या आंतरवासिता कक्षाचा कक्ष अधिकारी म्हणून नियुक्त करावा. तसेच आंतरवासिता कक्षामध्ये विद्यार्थी समन्वयकांची निवड करणे अनिवार्य आहे.

६) आंतरवासिता कक्षाची स्थापना केल्यानंतर लगेच कक्ष प्रमुखाची माहिती विद्यापीठास सादर करावी.

७) आंतरवासिता कक्षाची माहिती महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर प्रकाशित करावी, आणि ही माहिती सातत्याने अद्यायावत करावी.

८) हे आंतरवासिता कक्ष महाविद्यालय परीसरातील औद्योगीक प्रकल्पांसोबत संपर्क करून महाविद्यालय व अशा प्रकल्पांमध्ये दुवा म्हणून कार्य करील. तसेच दुरूस्त प्रणालीद्वारे उपलब्ध साधनांचा वापर करून विद्यार्थ्यांना आंतरवासिताच्या संधी उपलब्ध करून देईल.

९) आंतरवासिता/Field Project संदर्भातील सेवायोजकांची माहिती महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर प्रकाशित करावी.

१०) आंतरवासिता/Field Project संदर्भात आपल्या परीसरातील विविध शासकीय/निमशासकीय कार्यालये अथवा खाजगी संस्था, उद्योजक इत्यादी संस्थांशी सामंजस्य करार करून विद्यार्थ्यांना आंतरवासिता पूर्ण करण्यासाठीची व्यवस्था करावी.

११) आंतरवासिता संदर्भात केलेल्या सामंजस्य करारांची माहिती महाविद्यालयाच्या संकेत स्थळावर प्रकाशित करावी.

१२) आंतरवासिता करणाऱ्या विद्यार्थ्यांची विषयनिहाय यादी तयार करावी.

१३) Field Project करणाऱ्या विद्यार्थ्यांची विषयनिहाय यादी तयार करावी.

१४) आंतरवासिता पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांचे मुल्यमापन करण्याची जबाबदारी महाविद्यालयातील आंतरवासिता कक्षाची असेल.

१५) आंतरवासिता कक्षाने केलेल्या उपक्रमांचा अहवाल वेळोवेळी विद्यापीठास सादर करावा.

डॉ. श्रीराम कावळे

प्र-कुलगुरू

Scanned with CamScanner